जा.क्र.- सानप/आस्था/४५
सातारा नगरपरिषद सातारा
दिनांक- १०/५/२०१६

# जाहीरात

## सातारा नगरपरिषद, निवड समिती सातारा

## सातारा नगरपरिषदेकडील वर्ग ४ च्या खुल्या व अनुशेषांतर्गत पदांची भरती

जाहीरात क्रमांक : सानप /आस्था/पदभरती/२०१६-१७/ मे २०१६

सातारा नगरपरिषदेकडील खाली नमूद वर्ग -४ प्रवर्गातील पदे भरावयाची आहेत. त्याकरीता पदासमोर विहीत केल्यानुसार शैक्षणिक अर्हता व पात्र पुरूष उमेदवाराकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र | पदाचे नाव | पदसंख्या | संवर्ग | वेतनश्रेणी | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|---|
| वर्ग-४ | | | | | |
| १ | फायरमन | ६ (सहा) | अ.जाती .१<br>अ.जमाती १<br>विजाअ १<br>खुला सवर्ग ३ पदे | ५२००-२०२००<br>ग्रेड वेतन १८०० | किमान माध्यमिक शालांत परीक्षा ( S.S.C) उत्तीर्ण व शासनमान्य राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र मुंबई यांचेकडील अग्निशमन पाठयक्रम ,फायरमन प्रशिक्षण पूर्ण असणे आवश्यक .<br>जड वाहन चालविण्याचा परवाना असणे आवश्यक .<br>शारीरीक पात्रता (किमान )<br>उंची -१६५ से.मी.<br>छाती-८१ से.मी. न फुगवता व ८६ से.मी. फुगवून<br>वजन- ५० किलो<br>दृष्टी : चष्म्यासह ६/६, चष्म्याशिवाय ५/५<br>नगरपरिषद सेवेत आल्यानंतर दर ५ वर्षानी राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र मुंबई यांचेकडील विहित केलेला उजळणी पाठयक्रम /प्रशिक्षण (Refesher Course )पूर्ण करणे बंधनकारक. |

२.वयोमर्यादा शासन निर्णय क्र.SRV२०१५/प्र.क्र.४०४/कार्या १२ दि.२५/०४/२०१६ अन्वये खुल्या प्रवर्गासाठी १८-३८ वर्षे व मागसवर्गीयांसाठी ४३ वर्षे इतकी करण्यात आली आहे.

३. अर्ज करण्याची पध्दत :- अर्ज ३० से.मी. X २१ से.मी. आकाराच्या पांढ-या कागदावर सोबतच्या नमुन्यात टंकलिखित किंवा संगणकावर छपाई करुन त्यावर उजव्या कोप-यात पासपोर्ट आकाराचा सद्यस्थितीतील फोटो लावावा . त्यावर उमेदवाराने स्वाक्षरी करुन राजपत्रित अधिकारी किंवा विशेष कार्यकारी अधिकारी यांची स्वाक्षरी घ्यावी. अर्जामध्ये जातीच्या प्रवर्गाचा स्पष्ट उल्लेख करावा. वरील पदांसाठी बंद लिफाप्यावर मुख्याधिकारी , सातारा नगरपरिषद यांचे नांवे दिनांक३१/५/२०१६ रोजी सांयकाळी ५.०० वाजेपर्यत पाहोचतील अशा बेताने पाठवावेत.

४. कोणत्याही परिस्थितीत टपाल खात्याची दिरंगाई वा अन्य परिस्थितीत वर नमूद केलेल्या मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.अर्ज पाठविताना फायरमन पदासाठी अर्ज याचा स्पष्ट उल्लेख लिफाप्यावर करावा.शैक्षणिक पात्रता, वय, अनुभव, जातीचा दाखला,इत्यादी आवश्यक सर्व

कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील. आवश्यक शैक्षणिक व अन्य अर्हता पूर्ण केलेल्या असावीत.

कोणत्याही परिस्थितीत सुरु असलेल्या अभ्यासक्रमांचा विचार केला जाणार नाही. पात्र उमेदवारांना लेखी परिक्षेबाबत कळविणेत येईल.

खालील प्रमाणे सदोष अर्ज पूर्णतः फेटाळण्यात येतील.

५. शासनमान्य राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र मुंबई यांचेकडील अग्निशमन पाठयक्रम पूर्ण नसलेला अर्ज .

६.सुवाच्य अक्षर नसलेले , अपूर्ण वा चुकीची माहिती भरलेले , आवश्यक शैक्षणिक अर्हता प्राप्त न केलेले , अर्जावर स्वाक्षरी वा फोटोग्राफ नसलेले अर्ज.

७. अर्जासोबत शैक्षणिक पात्रता व अर्हता , अन्य आवश्यक अर्हता इ. बाबत साक्षांकित प्रमाणपत्र सादर न केलेले अर्ज .

८. अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांक व वेळेनंतर प्राप्त झालेले अर्ज

९. दिनांक ०१/०५/२०१६ रोजी कमाल वयोमर्यादेपेक्षा अधिक वय असलेले किंवा किमान वयोमर्यादेपेक्षा कमी वय असलेले अर्ज.

१०. वर नमूद केलेल्या कारणाने नाकारलेल्या अर्जाबाबत कोणताही पत्र व्यवहार करण्यात येणार नाही.

११. उमेदवारांनी अर्जासोबत आवेदन शुल्क न्यायालय फी मुद्रांक ( कोर्ट फी स्टॅम्प ) किंवा रेखांकित भारतीय पोस्टल ऑर्डर या स्वरुपात जोडावी.

अ) राखीव प्रवर्गासाठी रुपये १००/-

ब) खुल्या प्रवर्गासाठी रुपये २००/-

१२. जाहीरातीनुसार उमेदवाराने अर्ज केला असेल व त्याची शिफारस नोंदणीकृत कार्यालयाकडून झाली असेल त्यांना लेखी परिक्षेसाठी एकच पत्र देण्यात येईल.

१३. पदांच्या तुलनेत मोठया प्रमाणावर अर्ज प्राप्त झाल्यास उच्च शैक्षणिक अर्हता, अनुभव इ. निकषाच्या आधारे मर्यादित उमेदवारांना बोलाविण्यात येईल. गुणानुक्रमे लेखी परिक्षेत उत्तीर्ण होऊन शाररीक पात्रतेमध्ये उत्तीर्ण होणा-या उमेदवारासच बोलाविण्यात येईल. उमेदवारास जात पडताळणी मध्ये वैध ठरविणेपर्यत किंवा जास्तीत जास्त सहा महिने पर्यत परिविक्षाधीन कालावधीसाठी नियुक्ती देण्यात येईल.

कोणत्याही परिस्थितीत अपात्र उमेदवारांचा विचार केला जाणार नाही.

दिनांक १० /०५/२०१६

सातारा नगर परिषद आस्थापना विभाग सातारा.

| मुख्याधिकारी, | उपनगराध्यक्ष, | अध्यक्ष |
|---|---|---|
| सातारा नगरपरिषद,सातारा. | सातारा नगरपरिषद,सातारा. | सातारा नगरपरिषद,सातारा. |

पासपोर्ट
आकाराचा
फोटो

**प्रति,**
**मा. मुख्याधिकारीसो , सातारा नगरपरिषद तथा**
**सदस्य सचिव, सातारा नगरपरिषद ,निवड समिती ,**
**सातारा .**

विषय :- .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. . या पदासाठी अर्ज

संदर्भ :- दिनांक ------------रोजीच्या दैनिक ----- वृत्तपत्रामधील जाहीरात

महोदय,

मी, आपणांकडील दिनांक /५/२०१६ च्या वर्तमानपत्रांत प्रसिध्द झालेल्या जाहीरातीमधील फायरमन पदाकरिता अर्ज करीत असून माझी माहिती खालीलप्रमाणे सादर करीत आहे.

१. उमेदवाराचे नाव :- --------------------------------------------------------------------------
- आडनाव स्वतःचे नाव वडीलांचे नाव /पतीचे नाव

२. पत्रव्यवहाराचा पत्ता :- ----------------------------------------------------------------
----------------------------------------------------------------

पिनकोड क्रमांक :

३. उमेदवाराचा संवर्ग (अनुसुचित जाती ,जमाती /खुला संवर्ग ) :-

४. जात व जातीचा प्रवर्ग :-

५. उमेदवार क्रिमी लेअरमध्ये येतो किंवा नाही :- होय/नाही

६ महाराष्ट्र राज्याचे अधिवासी आहांत काय ? :- होय/नाही

७ अर्जदाराने जनगणनेच्या कामावर काम केले आहे काय ? :- होय/नाही

८. जन्मतारीख :-
तारीख महिना वर्ष दिवस

९. दिनांक १ /५/ २०१६ रोजी वय वर्ष महिने दिवस

D:\Fireman\FIRMAN (Autosaved)_1.docx

१०. जन्मठिकाण :- गाव/शहर तालुका जिल्हा राज्य

११. शालांत व पदवी /परिक्षा किंवा अन्य अर्हता याबाबत उत्त्ीर्ण झालेल्या सर्व परिक्षांचा तपशिल (तांत्रिक अर्हता संह)

| परिक्षेचे नाव | विद्यापिठाचे /संस्थेचे नाव | विषय | परिक्षेत् मिळालेले एकुण गुण टक्केवारी | परिक्षा उत्त्ीर्ण झाल्याचे वर्ष |
|---|---|---|---|---|
| | | | | |

१२ राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्राचा अग्निशामक पाठयक्रम पूर्ण केल्याचा तपशील

| परिक्षेचे नाव | विद्यापिठाचे /संस्थेचे नाव | विषय | परिक्षेत् मिळालेले एकुण गुण टक्केवारी | परिक्षा उत्त्ीर्ण झाल्याचे वर्ष |
|---|---|---|---|---|
| | | | | |

१३. पुर्वानुभव असल्यास

| अ.क्र | कार्यालयाचे/विभागाचे नाव व पत्ता | काम केलेल्या पदाचे नाव | सेवेच्या कालावधी | | एकूण कालावधी | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यत | पासून | पर्यत |
| | | | | | | |

१४. जिल्हा कौशल्य विकास रोजगार उद्योजोकता मार्गदर्शन केंद्राकडे नाव नोंदविले असल्यासच कार्यालयाचे नांव व नोंदणी क्रमांक , व नुतनीकरणाची तारीख अर्जामध्ये नमूद करणे बंधनकारक आहे.

१५. राष्ट्रीयत्व :- भारतीय/अभारतीय

१६. अर्जासोबत खालील प्रमाणे सांक्षाकिंत प्रती जोडल्या आहेत.

१.
२.
३.
४.
५.

१७. अर्जासोबतचे शुल्काचा तपशील
अ) मागासवर्गीय उमेदवारांनी कोणत्याही राष्ट्रीयकृत बॅकेचा मा. मुख्याधिकारी सातारा नगरपरिषद सातारा यांचे नावे रु १००/- चा डिमांड ड्राप्ट काढून अर्जासोबत जोडावा.

ब ) खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी कोणत्याही राष्ट्रीयकृत बॅकेचा मा. मुख्याधिकारी सातारा नगरपरिषद सातारा यांचे नावे रु २००/- चा डिमांड ड्राप्ट काढून अर्जासोबत जोडावा.
१८) मागासवर्गिय उमेदवारांनी अर्जासोबत जातपडताळणी वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.
उमेदवाराने करावयाचे प्रतिज्ञापत्र -

असे प्रमाणित करतो की , वर दिलेली माहिती ही संपुर्ण पणे खरी व सत्य आहे त्या पुष्टर्थ मी, प्रमाणपत्राच्या सत्यप्रती सादर करीत आहे. मी आणखी असेही प्रमाणित करतो की , वर दिलेली माहिती खोटी असल्याचे आढळून आल्यास माझ्या विरुध्द कायदेशीर कारवाई होईल तसेच या माहितीच्या आधारे होणारी शिफारस किंवा नियुक्ती रद्द होईल. याची मला जाणीव आहे. त्यासंबधी निवडसमितीचा अथवा नियुक्ती प्राधिकारी , मुख्याधिकारी यांचा निर्णय माझ्यावर बंधनकारक राहील. खोटी माहिती सादर केल्यामुळे मला नोकरीतून कमी केल्यास माझी कोणतीही तक्रार असणार नाही.

ठिकाण :-

आपला विश्वासू

दिनांक :-

अर्जदाराची सही